**दिनांक 29/03/2025**

**1.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/03/2025 रोजी 10:30 वा च्या सुमारास मौजे तळेगाववाडी, खालापुर येथे मौजे तळेगाववाडी ता.खालापुर येथे भाडयाने राहणारा अनोळखी इसम या इसमाने फिर्यादी याचे होंन्डा कंपनीची काळया रंगाची त्यावर लाल रंगाचे पटटे असलेले शाईन मोटारसायकल नंबर एम.एच.46/सी.डी./3559 ही तळेगाववाडी,ता.खालापुर येथुन फिर्यादी यांना विश्वासात घेवुन इलेक्ट्रीकलचे सामनासाठी शेडुन टोलनाक्याजवळ मित्राकडुन पैसे घेवुन येतो असे खोटे सांगुन मोटारसायकल घेवुन त्याची मुलगी हीचे सह निघुन गेला आहे तो आजपर्यंत मोटारसायकल घेवुन परत आला नसल्याने त्याने फिर्यादी यांची फसवणुक केली.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं. 69/2025, बी.एन.एस कलम 316 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री प्रकाश माळी हे करीत आहेत.

**2.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 14:45 वा च्या सुमारास मौजे ईद्रंपे सासवणे येथे महिला फिर्यादी रा. 15 बी/01 वुडलॅड्स 67 परेड रोड, मुंबई यांचे बंगल्यामध्ये ता.अलिबाग येथे फिर्यादी यांच्या मालकीचे ईद्रंपे सासवणे या बंगल्यामधील साहीत्य अनोळखी पुरुष व महीला यांनी बंगल्याच्या मेन दरवाजाचा कडी कोयंडा तोडुन आतमध्ये प्रवेश करून एकूण 3000/- रुपये व किमतीचे साहित्य चोरुन नेले आहे.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं.42/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 331(3), 305(+),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अंकुश सोळसे, हे करीत आहेत.

**3.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/03/2025 रोजी 06:30 वा च्या सुमारास मौजे रेवस बायपास या सार्वजनिक रस्त्यावरती एक्झीक्युटीव बास्केट गिफट फ्रॉम हर्ट या दुकानाचे समोरुन अलिबाग येथे दिनांक 28/03/2025 रोजी फिर्यादी यांचा मुगला हा रेवस बायपास रोडवरुन रिलायन्स बायपास बाजुकडे जात असताना तो रेवस बायपास या सार्वजनिक रस्त्यावरती एक्झीक्युटीव बास्केट गिफट फ्रॉम हर्ट या दुकानाचे समोरुन जात असताना समोरुन रस्त्याचे विरुध्द लेनमधुन एक पांढ-या रंगाची होंडा ॲक्टीवा कंपनीची दुचाकी क्र एमएच 06 सीजी 2836 हिने फिर्यादी यांचे मुलाचे दुचाकी क्र एमएच02 सीजे 8531 हिला जोरधार धडक देवुन अपघात केला यामध्ये फिर्यादी यांचा मुलगा हा गंभीर जखमी झाल्याने त्याला उपचारा कामी सव्हिल रुग्णालय अलिबाग येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासुन त्याला मयत

घोशीत केले आहे.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं.56/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता 106 (1),281 125(A),125(B) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/मिथुन मातेरे, हे करीत आहेत.

**4.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/03/2025 रोजी 11:30 वा च्या सुमारास मौजे भगिरथीखार, गोफण गावचे हद्दीमध्ये ता. रोहा,येथे महिला फिर्यादी रा.आग्राव, पो.चौल ता.अलिबाग या भगिरथीखार गावचे हद्दीत सुकी मासळी विकण्याकरीता जात असताना आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन काळया रंगाचे स्कुटी मोटारसायकल एम.एच.47,ए.आर.3903 वरुन येवुन फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची माळ जबरदस्तीने हिसकावुन चोरुन नेली. सदर गुन्ह्यातील आरोपीत क्र 01 व 02 दिनांक वेळ: 28/03/2025 रोजी 18:05 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं. 64/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 309(4) ,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोहवा/ टेमकर, हे करीत आहेत.

**5.** रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 19/03/2025 रोजी 18:00 वा ते दि. 20/03/2025 रोजी 18:00 वा च्या दरम्यान मौजे कराडे बुद्रक गावचे हददीतील इस्कॉन कंपनीमध्ये, खालापुर येथे एकूण 53,500/- रुपये व किमतीचा मुददेमाल हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी व त्यांचे कंपनीचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने स्वत:चे फायदयाकरीता चोरी करुन नेला.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं. 70/2025, बी.एन.एस कलम 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/चौरे, हे करीत आहेत.

**6.** खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/03/2025 रोजी 18:30 वा च्या सुमारास मौजे लोधीवली गावचे हददीत फिर्यादीच्या अंगणामध्ये ता.खालापुर येथे आरोपीत रा. लोधीवली ता.खालापुर यांची लहान मुलांचे खेळण्यावरुन वाद होवून त्या गोष्टीचा आरोपीत क्र1 हीने मनात राग धरुन फिर्यादी यांची पत्नी साक्षीदार हीला शिवीगाळी करुन तिला हाताने मारहाण केली त्यावेळी फिर्यादी हे सदर घटनेची त्यांचे मोबाईलमध्ये शुटीग करीत असताना आरोपीत क्र1 यांनी फिर्यादी याला शुटींग करु नको असे बोलून त्याचे हातातुन मोबाइल घेवुन फिर्यादी याला हाताने दोन फटके मारुन तेथुन निघुन गेली त्यानंतर फिर्यादी व त्याचा मुलगा हे संध्याकाळी 18.30 वाजता घराच्या बाहेर मोटारसायकल वर बसलेले असताना आरोपीत क्र 01 ते 03 हे फिर्यादी याचे जवळ येवुन आरोपीत क्र3 यांनी फिर्यादी याचे डोक्यात हेल्मेट मारुन तसेच आरोपीत क्र02 यांनी त्याचे हातातील गाडीचे चावीने फिर्यादीचे गाळावर व डोक्यावर फाईट मारुन फिर्यादी यांना दुखापत केली तसेच आरोपीत क्र3 यांनी फिर्यादी याचे गाडीला लाथ मारुन गाडी खाली पाडली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं. 106/2025, भारतीय न्याय संहिता कलम 118 (1)

,115 (2) ,352,3 (5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/रतन बागुल, हे करीत आहेत.

**7.** अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे बेलवली येथील सर्वे नं-68/6 हया साडेसहा एकर जागेमध्ये कंम्पाउटचे आतमध्ये ता.अलिबाग, येथे आरोपीत यांनी मौजे बेलवली ता.अलिबाग येथील फिर्यादी यांची मालकीन यांचे सर्वे नं-68/6 हया साडेसहा एकर जागेमध्ये कंम्पाउटचे आतमध्ये बंगलो बांधण्याचे काम चालु असताना आरोपीत क्रं 1,2,3,4 हे त्याठिकाणी आले व त्यांनी सदर जागेचे गेटमधुन आत शिरुन अतिक्रमण करुन फिर्यादी यांना शिवीगाळी,धमकी देवुन मारहाण केली तसेच फिर्यादी व त्याचे सोबत काम करणारे कामगार यांना गेटचे बाहेर काढले व सदरचे काम आम्हाला मिळाले पाहीजे व आमचे व्यतिरिक्त दुसरे कोणालाही सदरचे काम करु देणार नाही आणी जर तुमचे मालकाला दुसरे कोणाला काम करु दयायचे असेल तर तुमचे मालकांने आम्हाला 1,00,000/- एक लाख रूपये मात्र) दिले पाहीजे असे बोलुन पैशांची मागणी केली.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे गुरनं. 57/2025 प्रमाणे BNS 333, 308(7), 351(2), 351(3),115(2),352, 3(5) गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/शरद शिंपणे, हे करीत आहेत.

**8.** खोपोली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 28/03/2025 रोजी 15:45 वा च्या सुमारास मौजे जुना मुंबई-पुणे हायवेवरील मुळगाव दर्गाजवळ रोडवर खोपोली, ता.खालापुर येथे आरोपीत रा.विहारी खोपोली ता.खालापुर याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल क्र., 46.-9235. ही अतिवेगाने, अविचाराने, बेदरकापने, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लेक्ष करून धोकादायक रित्या चालवुन रोडमधील स्पिडब्रेकर वरून उडुन समोरील टॅम्पो क्र. ग्क्त-03-क्ष्-8730 हीस पाठीमागील बाजुस ठोकर मारून अपघात करून अपघातात स्वतःचे लहान मोठया गंभीर दुखापतीस होवुन मरणास व मोटार सायकलचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे गुरनं. 92/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184 , भारतीय न्याय संहिता कायदा 2023 106(1),281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/अमोल धायगुडे, हे करीत आहेत.

**9.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 20/09/2023 रोजी 00:00 वा ते दि. 28/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे रा. मु. बारशेत, पो. वाली येथे फिर्यादी यांचे कुटुंबीयाचे नावावर असणारी जमीन गावकीचे नावावर करुन देण्यास फिर्यादीने विरोध केल्याने त्या गोष्टीचा राग मनात धरुन सप्टेबंर 2023 पासून ते आज पावेतो आमचे बारशेत ग्रामस्थ कमिटी मधील आरोपीत यांनी आपआपसात संगनमत करुन बारशेत ग्रामस्थांनी फिर्यादी बरोबर संबंध तोडून,.प्रत्येक सणाचे आधी गावकीमध्ये सभा घेउन फिर्यादी यांचे कुटुंबियांवर निर्बंध ठेवण्याचे ठराव करून तसेच इतर विविध मार्गाने फिर्यादी व त्यांचे कुटुंबियांना वाळीत टाकून सामाजीक बहिष्कार टाकला.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं. 65/2025, बी.एन.एस. कलम351(2),126(2),3(5) महाराष्ट्र सामाजीक बहिस्कारापासुन व्यक्तीचे संरक्षण (प्रतीबंध,बंदी व निवारण)अधीनीयम 2016 चे कलम 5 प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनी रावडे , हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 28.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 234 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,55,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.